[विक्रेय-व. का. (मुं. सा. वि.) २-म.

76

नोंदणीचे प्रमाणपत्र

याद्वारे प्रमाणपत्र देण्यात येते की, खाली वर्णन केलेली सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ही आज, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) या अन्वये पुणे विभाग पुणे .... येथील सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था नोंदणी कार्यालयात योग्य रीतीने नोंदण्यात आलेली आहे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे नाव अजिंक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान. मु.पो. शिक्रापुर, ता. शिरुर, जि. पुणे.

सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक F - 35088 (पुणे)

श्री. रामदास बबन मासळे .... यांस प्रमाणपत्र दिले.

आज दिनांक 16.09.2012 रोजी माझ्या सहीनिशी दिले.

सही ....

शिक्का

Asst. Charity Commissioner Pune

सहाय्यक धर्मादाय आयुक्त
पुणे विभाग, पुणे

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

विशेष—म.स.मु. सा. वि./५० म.

क्रमांक

062

नोंदणी प्रमाणपत्र

संस्था नोंदणी अधिनियम, १८६०

(१८६० चा अधिनियम २१)

नोंदणी क्रमांक महाराष्ट्र/ 9820 /२००३/पुणे

याद्वारे असे प्रमाणित करण्यात येते की, अजिंक्य तारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान मु. पो. शिक्रापूर ता. शिरूर जि. पुणे

लील तारखेस संस्था नोंदणी अधिनियम, १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) अन्वये योग्यरीत्या नोंदणी करण्यात आली. द्वारा - श्री रामदास बबन सासवडे

तारीख २८/११/०३ १९ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

(सही)

संस्थांचे सहायक निबंधक,

पुणे विभाग.

ASSISTANT REGISTRAR OF SOCIETY, PUNE REGION, PUNE

(सही)

सचिव

अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण

शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

Certified True Copy

(Sign)

Head Master

Vidyadham Prashala, Shikrapur,

Tal. Shirur, Dist. Pune

महाराष्ट्र/ 9820 /२००३/पुणे
दिनांक- 22/9/२००३

परिशिष्ट - ब

संस्थेचे ज्ञापन

संस्थेचे नांव	:	अजिंक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान द्वारा: रामदास बबन सासवडे.
संस्थेचा पत्ता	:	मु.पो. शिक्रापुर, ता. शिरूर, जि.पुणे.
संस्थेचे कार्यक्षेत्र	:	पुणे जिल्हा / महाराष्ट्र राज्य.
संस्थेचे उद्देश	:	

क्रीडा विषयक : मैदानी खेळांच्या प्रचारा व प्रसारा करिता विविध स्तरांवर क्रीडास्पर्धा आयोजित करणे. तज्ञ प्रशिक्षकांमार्फत खेळांचे प्रशिक्षण वर्ग सुरू करणे. अत्याधुनिक व्यायामसाहित्यांनी उपलब्ध अशी व्यायामशाळा सुरू करणे, आसन, प्राणायाम, योगासने वर्ग सुरू करणे, सुदृढ व निरोगी आरोग्यासाठी लहानपणापासुनच मुला मुलींमध्ये व्यायामाची आवड निर्माण करणे, त्यांना व्यायामाचे महत्व पटवुन देणे, त्यांना खेळासाठी व व्यायामासाठी उत्तेजन देण्यासाठी विविध क्रिडास्पर्धा आयोजित करणे, त्यांना त्यासाठी क्रिडासाहित्य व क्रिडांगणे उपलब्ध करून देणे, स्पर्धातील विजेत्या खेळांडूना व संघाना बक्षीसे प्रदान करणे, तरूणाबरोबर प्रौढांना व वृध्दांना शारिरिक फिटनेससाठी ध्यान धारणा, योगासने, जॉगिंग ट्रॅक व क्रिडा संकुलनाची स्थापना करणे, उन्हाळयाच्या सुट्टीमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध क्रिडाप्रकाराचे प्रशिक्षण शिबीर आयोजित करणे, क्रिडा शिबीरांबरोबरच संस्कार शिबीरे, व्यक्तिमत्वविकास शिबीरे आयोजित केले जातील.

कला व सांस्कृतिक: तरूण तरूणींना व विद्यार्थी व विद्यार्थ्यांना विविध कलांचे प्रशिक्षण देणे, उदा: संगीत, नृत्य, नाटय, अभिनय इत्यादी, संस्थेच्या कार्यक्षेत्रातील हुशार, गुणी, होतकरू, दुर्लक्षित व उपेक्षित कलाकारांना संस्थेच्या माध्यमातुन व्यासपिठ उपलब्ध करून दिले जाईल. त्यांना सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील. संस्थेच्या माध्यमातुन त्यांनी प्रशिक्षण दिले जाईल. परिक्षा घेऊन त्यांना बक्षीसे व प्रशस्तीपत्रके प्रदान केले जातील. परिक्षा घेऊन त्यांना बक्षीसे व प्रशस्तीपत्रके प्रदान केले जातील. संस्थेचे स्वतःचे सांस्कृतिक भवन स्थापन केले जाईल. तेथे विविध नाटय स्पर्धा, संगित स्पर्धा, कथाकथन, प्रश्नमंजुषा इत्यादी बौध्दीक स्पर्धा आयोजित करण्यात येईल.

शैक्षणिक : संस्थेच्या कार्यक्षेत्रातील लोंकाना शिक्षणांचे महत्व पटवुन देणे, कार्यक्षेत्रातील हुशार व गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहीत्यांचे वाटप करणे. उदा: वहया , पुस्तके, गणवेश इ. तसेच हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या देणे, कार्यक्षेत्रात वाचनालय, ग्रंथालय, अभ्यासिका सुरू करणे.संस्थेच्या कार्यक्षेत्रात विविध शिक्षणसंस्था सुरू करणे, संगणक प्रशिक्षण वर्ग सुरू करणे, तंत्रशाळा, अभियांत्रिकी, वैद्यकिय महाविद्यालये सुरू करणे.विद्यार्थ्यांकरिता वसतीगृहे सुरू करणे.

(अध्यक्ष)	(उपाध्यक्ष)	(सेक्रेटरी)
(श्री. रा.ब.सासवडे.)	(श्री. सु.द.चव्हाण.)	(श्री. का.सुं.गव्हाणे)

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

वैद्यकिय : समाजातील कोणीही वैद्यकिय सेवेपासून वंचित राहू नये यासाठी विविध आरोग्य शिबीरांचे आयोजन करणे, रक्तदान चिकित्सा शिबीरांचे आयोजन करणे, शक्य असल्यास संस्थेतर्फे रूग्णवाहिका सुरू करणे, असाध्य रोगाच्या उपचाराकरीता शक्य ती वैद्यकिय व आर्थिक मदत करणे,

राष्ट्रीय उत्सव : निरनिराळे राष्ट्रीय व सामाजिक सण व उत्सव साजरे करणे, उदाः 15 ऑगस्ट, 26 जानेवारी, महाराष्ट्र दिन तसेच थोर राजकीय पुढायांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, त्यांच्या थोर तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे, त्यांप्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे, गणेशोत्सव, दुर्गोत्सव, शिवजयंती इ. सण साजरे करणे, संस्कारवर्ग, संस्कारशिबीरे आयोजित करणे, संस्थेचे सांस्कृतिक भवन उभारणे.

सामाजिक व विधायक : समाजातील अनिष्ट प्रथाविरोधात जनजागरण करणे, उदाः हुंडाप्रथा, जुनाट चालीरिती,अंधश्रध्दा इ. दारूबंदी, व्यसनमुक्ती आदोंलन सुरू करणे, साक्षरता प्रसार, प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करणे, साक्षरता अभियान राबविणे, समाजातील ज्वलंत प्रश्न उदाः लोकसंख्या, एडस व पर्यावरण याबाबत जनजागरण करणे, पर्यावरण संतूलनासाठी सामाजिक वनिकरण, वृक्षारोपण असे उपक्रम राबविणे, श्रमदान शिबीरे, स्वच्छता मोहिम, आदर्श गांव योजना राबविणे, कार्यक्षेत्रात वृध्दाश्रम, अनाथाश्रम, महिलाश्रम सुरू करणे, बालसंगोपन केंद्रे सुरू करणे, नैसर्गिक आपतग्रस्तांना सर्वतोपरी मदत करणे, या व अशा अनेक उपक्रमांतुन समाजप्रबोधनाचे कार्य हाती घेणे.

---

5. सदरहू संस्थेच्या नियम व नियमावलीनुसार ज्या कार्यकारी मंडळावर सदरहू संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपावली आहे अशा कार्यकारी मंडळातील पहील्या सभासदांची संपूर्ण नांव व पत्ता, वय, व्यवसाय, पद व राष्ट्रीयत्व पुढील प्रमाणे राहतील.

अ.क्र.	सभासदांचे नांव व पत्ता	वय	व्यवसाय	पद	राष्टीयत्व
1.	श्री. रामदास बबन सासवडे.	28	शेती	अध्यक्ष	भारतीय.
2.	श्री. गोरख दत्तोबा सासवडे.	32	शेती	कार्याध्यक्ष	भारतीय.
3.	श्री. सुरेश दगडू चव्हाण.	29	शेती	उपाध्यक्ष	भारतीय.
4.	श्री. कानिफ सुर्यभान गव्हाणे.	28	शेती	सेक्रेटरी	भारतीय.
5.	श्री. शामराव बबन सासवडे.	26	शेती	खजिनदार	भारतीय.
6.	श्री. सोपान किसनराव नरवडे.	30	शेती	सदस्य	भारतीय.
7.	श्री. यशवंत नारायणराव थोरात.	30	शेती	सदस्य	भारतीय.
8.	श्री. मच्छिंद्र दत्तोबा सासवडे.	30	शेती	सदस्य	भारतीय.
9.	श्री. कैलास आंनदराव धुमाळ.	29	शेती	सदस्य	भारतीय.
10.	श्री. कानिफ दशरथ सासवडे.	26	शेती	सदस्य	भारतीय.
11.	श्री. संजय भरत काळे.	28	शेती	सदस्य	भारतीय.

सर्व सभासद राहणार : मु.पो. शिक्रापूर, ता. शिरूर, जि.पुणे. असा राहील.

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापूर, ता.शिरूर, जि.पुणे.

(उपाध्यक्ष) (सेक्रेटरी)

6. वरील आम्ही सर्व आम्हा सर्वाची ' ' **अजिंक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान** ' .
या नावाची संस्था स्थापन करू इच्छीतो व संस्था नोंदणी अधिनियम सन 1860 अन्वये संस्था नोंदवू इच्छीतो म्हणुन आम्ही सर्व एकत्र येऊन आज दिनांक 15/10/03 रोजी या ज्ञापनावर सहया करीत आहोत.

अं.क्र. सभासदांचे नांव व पत्ता	सही
1. श्री. रामदास बबन सासवडे.	रा. ब. सासवडे.
2. श्री. गोरख दत्तोबा सासवडे.	गो. द. सासवडे.
3. श्री. सुरेश दगडू चव्हाण.	सु. द. चव्हाण
4. श्री. कानिफ सुर्यभान गव्हाणे.	का. सु. गव्हाणे
5. श्री. शामराव बबन सासवडे.	S. B. Saswede
6. श्री. सोपान किसनराव नरवडे.	S. K. Narwade
7. श्री. यशवंत नारायणराव थोरात.	य. ना. थोरात
8. श्री. मच्छिंद्र दत्तोबा सासवडे.	म. द. सासवडे
9. श्री. कैलास आंनदराव धुमाळ.	कै. आ. धुमाळ
10. श्री. कानिफ दशरथ सासवडे.	K. D. Saswede
11. श्री. संजय भरत काळे.	सं. भ. काळे

सर्व सभासद राहणार वरील कॉलम प्रमाणे.

वरील सर्व इसमांना मी ओळखत असून त्यांनी माझे समक्ष या ज्ञापनावर सहया केल्या आहेत त्या मी ओळखतो.

स्थळ : पुणे
दिनांक 15 OCT 2003

AZIM N. SAYED
B.Com. LL.B. (Advocate) स्पे.ए.मॅ/वकिल
सही व शिक्का.

' प्र मा ण प त्र '

यावरून असे प्रमाणित करण्यात येते की, ' ' **अजिंक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान** '
या नावाची अथवा या नांवात साम्य असलेली दुसरी कोणतीही संस्था आमचे उत्तम माहिती नुसार व समजूती नुसार या भागात किंवा परिसरात अस्तित्वात नाही किंवा संस्था नोंदणी अधिनियम सन 1860 अन्वये संस्था नोंदविण्यात आलेली नाही.

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

स्थळ : पुणे
दिनांक : 15/10/03

अध्यक्ष	उपाध्यक्ष	सेक्रेटरी
रा. ब. सासवडे	सु. द. चव्हाण	का. सु. गव्हाणे
(श्री. रा.ब.सासवडे.)	(श्री. सु.द.चव्हाण.)	(श्री. का.सु.गव्हाणे)

महाराष्ट्र/ 9820/२००३/पुणे
दिनांक- 22/11/२००३

परिशिष्ट : क :

धर्मादाय संस्था निरीक्षक
पुणे विभाग, पुणे

संस्थेचे नियम व नियमावली

संस्थेचे नांव : " अजिंक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान "
द्वारा: रामदास बबन सासवडे.
मु.पो.शिक्रापुर, ता. शिरूर, जि.पुणे.

संस्थेचा पत्ता :

1) संदर्भीय शब्दांची व्याख्या :

अ. संस्था : संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम सन 1860 व मु.सा.वि.व्य. अधिनियम सन 1950 अन्वये नोंदविण्यात येणारी संस्था.

ब. नियम व नियमावली : संस्था नोंदणी अधिनियम म्हणजे सन 1860 चा भारत सरकारचा कायदा व त्याखाली येणारे संस्था स्थापन करण्यात येताना कार्यकारी मंडळाने तयार केलेले नियम.

क. कार्यकारी मंडळ : संस्थेचे कार्यकारी मंडळ म्हणजे संस्थेच्या नियम व नियमावली नुसार संस्था स्थापनेच्या वेळी व नंतर संस्थेच्या सर्वसाधारण सभेत निवडून येणारे मंडळ किंवा विश्वस्त की ज्यांचे वर संस्थेची जबाबदारी व व्यवस्था सोपविली आहे असे मंडळ., अशा कार्यकारी मंडळात अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार व अन्य आवश्यक असल्यास इतर पदे प्रामुख्याने असतील.

ड. सभासद : संस्थेचे नियम व नियमावली मान्य असणारी व कार्यकारी मंडळाने प्रवेश दिलेली नियमीतपणे वर्गणी भरणारी व्यक्ती संस्थेचे सभासद म्हणून संबोधण्यात येईल.

ई. अनुसूची : या नियमावली सोबत जोडलेल्या स्वतंत्र अशा अनुसूची 1, 2, 6 की ज्या सन 1971 च्या संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियमाप्रमाणे आहेत.

फ. उद्देश : ज्ञापनपत्रात नमूद केलेले उद्देश की ज्या करता संस्था स्थापन करण्यात येत आहेत असे उद्देश.

2) संस्थेचे कार्यक्षेत्र :
संस्थेचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा / महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित राहील.

3) हिशोबाचे वर्ष :
संस्थेचे हिशोबाचे वर्ष 1 एप्रिल ते 31 मार्च असे राहील.

4) सभासदत्व व त्यांची नोंदणेची पध्दत :
संस्थेचे नियम व नियमावली तसेच ध्येय धोरणे मान्य असणारी व सामाजिक कार्याची आवड असलेल्या कोणत्याही सज्ञान व्यक्तीस संस्थेचे सभासद होता येईल. परंतू सभासद होऊ इच्छिणा-या व्यक्तीने संस्थेकडे असणारा नमूना अर्ज दोन सभासदांच्या शिफारसीसह व प्रवेश फी सह कार्यकारी मंडळाकडे पाठविला पाहिजे. कार्यकारी मंडळाने त्यास मंजूरी दिल्यानंतरच अर्जदार व्यक्तीस सभासदत्वाचे अधिकार प्राप्त होतील. सभासद करून घेणे अथवा नाकारणेचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.

5) सभासदांचे प्रकार :
अ) संस्थापक सभासद ब) वर्गणीदार सभासद क) आजीव सभासद ड) देणगीदार किंवा हितचिंतक किंवा आश्रयदाते सभासद ई) सन्माननीय सभासद.

अध्यक्ष	उपाध्यक्ष	सेक्रेटरी	सचिव
(श्री. रा.ब.सासवडे.)	(श्री. सु.द.चव्हाण.)	(श्री. का.सु.गव्हाणे)	अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

अ. संस्थापक सभासद	:	संस्था स्थापनेच्या वेळी संस्थेच्या ध्येय धोरणांनी प्रेरित होऊन संस्थेच्या ज्ञापनावर सहया करणा-या सभासदांना संस्थापक सभासद संबोधण्यात येईल. त्यांचेकडून प्रवेश फी रू. 5/- व वार्षिक वर्गणी रू. 100/- घेण्यात येईल.
ब. वर्गणीदार सभासद	:	जे सभासद प्रवेश फी रू. 5/- व संस्थेची मासिक वर्गणी रू. 10/- किंवा वार्षिक वर्गणी रू. 100/- एकदम पूर्ण भरतील त्यांना वर्गणीदार सभासद म्हणून संबोधण्यात येईल.
क. आजीव सभासद	:	जी व्यक्ती एकदम एकरकमी रू. 5000/- संस्थेला देईल त्यांना आजीव सभासद म्हणून संबोधण्यात येईल.
ड. देणगीदार किंवा आश्रयदाते सभासद	:	संस्थेला देणगीरूपाने किंवा वस्तूरूपाने देणगी देणा-या व्यक्तीला देणगीदार किंवा आश्रयदाते सभासद म्हणून संबोधण्यात येईल. परंतू अशा व्यक्तीस मतदानाचा अधिकार राहणार नाही तसेच ते निवडणूकीस पात्र राहणार नाहीत.
ई. सन्माननीय सभासद	:	समाजातील वेगवेगळया क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तीस संस्थेचे सन्माननीय सभासदत्व बहाल करण्यात येईल. अशा सभासदांना देखील निवडणूक लढविता येणार नाही व मतदान करता येणार नाही.

6) सभासदत्व रद्द होणे :

अ) एखादया सभासदाचा मृत्यू झाल्यास., नादार ठरल्यास, शारीरिक अथवा मानसिक दौबर्ल्य आल्यास, ब) संस्थेच्या एखादया सभासदाने राजीनामा दिल्यास व तो कार्यकारी मंडळाने स्विकारल्यास सभासदत्व रद्द होईल., क) एखादया सभासदास फौजदारी गुन्हयासाठी शिक्षा झाल्यास, ड) संस्थेच्या हितास बाधक असे कृत्य केल्यास त्या सभासदास सदर कृत्याबद्दल खुलासा करण्याची संधी देऊन सभासदत्व रद्द करण्याचा ठराव कार्यकारी मंडळाने सभेपुढे मांडून नंतरच सभासदत्व रद्द करण्यात येईल, ई) मंडळाची वर्गणी सलग तीन वर्षे न भरल्यास., फ) संस्थेच्या सभांस सतत गैरहजर राहिल्यास इ. कारणांनी सभासदत्व रद्द होईल.

7) वार्षिक सर्वसाधारण सभा तिचे अधिकार व कार्य :

संस्थेच्या नियमाप्रमाणे सभासदत्व प्राप्त झालेल्या व मतदानाचा अधिकार असलेल्या सर्व सभासदांची मिळून सर्वसाधारण सभा होईल. कोणत्याही परिस्थितीत संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्यांत कार्यकारी मंडळाने अशी सर्वसाधारण सभा बोलाविली पाहिजे. कार्यकारी मंडळाने ती बोलाविली नाही तर 3/5 सभासद एकत्र येऊन अशी सभा घेणेबाबत योग्य ते निर्णय घेऊ शकतील आणि त्यानुसार होणा-या सभेत संगत झालेले ठराव कार्यकारी मंडळावर बंधनकारक राहतील.

अधिकार व कार्य :

वार्षिक सर्वसाधारण सभेत कार्यकारी मंडळाने सादर केलेला जमाखर्च ताळेबंद अहवाल मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून दाखविला जाईल तसेच पुढील वर्षासाठीचे अंदाजपत्रक तयार करणे व या सर्वांच्या प्रति वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांना दिल्या जातील. कार्यकारी मंडळाची निवड करणे व निवडणूकीचे निकाल जाहीर करणे, पुढील वित्तीय वर्षासाठी चार्टर्ड अकौंटंट अथवा ॲथोराईज्ड ऑडिटर नेमणे, नियम व नियमावलीमध्ये दुरूस्ती असल्यास त्याला मान्यता देणे, उद्देशपूर्तीसाठी संस्थेच्या ध्येय धोरणानुसार चर्चा करणे व निर्णय घेणे, अध्यक्षांच्या परवानगीने येणारी व इतर सभासदांनी सभेपुढे आणलेली कामे करणे, त्याचप्रमाणे अशा सभेत वर्षभर केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येईल. संस्थेच्या सर्व बाबतीत या सभेचा निर्णय अंतिम समजण्यात येईल.

अध्यक्ष (श्री. रा.ब.ससवडे.) उपाध्यक्ष (श्री. सु.द.चव्हाण.) सेक्रेटरी (श्री. का.सु.गव्हाणे)

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठान
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

८) सर्वसाधारण सभेची सूचना व गणसंख्या :

कार्यकारी मंडळाने ठरविलेल्या दिवशी, वेळी व ठिकाणी सेक्रेटरी अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने परिपत्रक काढून सर्वसाधारण सभा बोलावतील. अशा परिपत्रकामध्ये सभेचे स्थळ व तारीख नमूद केलेली असेल. अशा नोटीशीचे परिपत्रक प्रत्येक सभासदाला सभेपूर्वी 15 दिवस आगोदर मिळेल अशी व्यवस्था असेल. नियम व नियमावलीमध्ये दुरुस्ती असेल तर त्याची नोटीस कमीत कमी पंधरा दिवस आधी दिली पाहिजे. वार्षिक सभेची नोटीस स्थानिक वर्तमानपत्रातून दिल्यास उत्तम पण ही गोष्ट बंधनकारक राहणार नाही. सभेची नोटीस प्रत्येक सभासदाला पोस्टाने अथवा सही घेऊन देण्यात येईल तथापि बाहेरगांवच्या सभेची नोटीस अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगने पाठवूनही न मिळाल्यास सदर सभेत मंजूर झालेल्या कामकाजास त्याची बाधा येणार नाही. संस्थेला खरोखरी उपयोगी होतील अशा व्यक्तींना निमंत्रित व निरीक्षक म्हणून कार्यकारी मंडळाच्या सभेत मंजूरी घेऊन बोलाविता येईल पण त्यांना सभेच्या मतदानात भाग घेता येणार नाही. सभेला कोरम पटावरील एकूण सभासद संख्येच्या 3/5 एवढी आवश्यक गणसंख्या राहील. परंतु कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलाविली जाईल व अशा सभेस कोरमची आवश्यकता भासणार नाही व तिचे सर्व कामकाज कायदेशीर राहील पण वार्षिक सभेच्या नोटीशीत तशी सूचना आवश्यक राहील.

९) विशेष सर्वसाधारण सभा व तिची कार्य :

कार्यकारी मंडळास सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखादया विशेष प्रसंगी सर्वसाधारण सभा बोलाविली जाईल त्यावेळी वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व नियम पाळण्यात येतील. तसेच पटावरील 2/3 सभासदांनी लेखी अर्ज केल्यास जादा सर्वसाधारण सभा अध्यक्षांनी बोलाविली पहिजे.

10) संस्थेचे कार्यकारी मंडळातील पदाधिकारी व त्यांची रचना :

संस्थेचे ध्येय व उद्देश सफल करण्यासाठी व संस्थेचे कामकाज पहाण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत हजर असणाया सभासदांमधून कमीत कमी अकरा व जास्तीत जास्त सतरा) सभासदांचे कार्यकारी मंडळ पाच वर्षांकरीता निवडून दिले जाईल व असे कार्यकारी मंडळ आपल्यामधून पदाधिकायांची निवड करतील. संस्थेचे पहिले कार्यकारी मंडळ हे नियुक्त राहील व त्यांची मुदत संस्था नोदंणी पासून पाच वर्षांपर्यंत राहील. आवश्यक वाटल्यास जादा स्वीकृत सभासद नेमण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. कार्यकारी मंडळ आपल्यामधून अध्यक्ष, कार्याध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी , खजिनदार व आवश्यक वाटल्यास जादा पदाधिकायांची निुयक्ती करतील व इतर कार्यकारी सभासद राहतील.

11) कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल हा पाच वर्षांचा राहील. दर पाच वर्षांनी संस्थेच्या एकूण मतदारांची यादी तयार करून सर्वसाधारण सभा बोलविण्यात येईल व अशा सभेत सर्वसाधारण सभेचे सभासद नवीन कार्यकारी मंडळाची निवड लोकशाही पध्दतीने करतील (निवडणूकीची कार्यवाही जुन्या कार्यकारी मंडळाकडून केली जाईल) निवडणूक होण्यापूर्वी एक महिना आगोदर सभासदांची यादी संस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केली जाईल. ज्या सभासदांनी आपली वर्गणीची रक्कम पूर्णपणे भरलेली आहे असेच सभासद निवडणूकीत भाग घेण्यास पात्र ठरतील. समसमान मते पडल्यास अध्यक्ष आपल्या पसंतीचे मत (कास्टींग वोट) देतील. देणगीदार सभासदांना व सन्माननीय सभासदांना मतदानास हजर राहता येईल परंतू मतदानात भाग घेता येणार नाही.

अध्यक्ष र. ब. सासवडे (श्री. रा.ब.सासवंड.) उपाध्यक्ष सु. द. चव्हाण (श्री. सु.द.चव्हाण.) सेक्रेटरी का. सु. गव्हाणे (श्री. का.सु.गव्हाणे)

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

12) कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्यांची कामे :

अ. अध्यक्ष :

वार्षिक सर्वसाधारण सभा, जादा सर्वसाधारण सभा व कार्यकारी मंडळातील सभेचे अध्यक्ष पद स्विकारून निपःक्षपणे सभा पार पाडणे, समान मत विभागणी झाल्यास निर्णायक जादा मत देणे, संस्थेच्या एकूण कामकाजावर नियमीत देखरेख व नियंत्रण ठेवणे, सेक्रेटरीनी संस्थेचे कामकाज सुरळीत व नियमीत पार पाडले नाही तर स्वतःच्या अधिकारात संस्थेची वार्षिक सभा बोलावणे. संस्थेच्या कागदपत्रावर सहया करणे, संस्थेचे बँक खाते चालविणे तसेच संस्थेच्या कामकाजाबाबत अंतिम निर्णय घेणे.

ब. उपाध्यक्ष :

अध्यक्षांच्या अनुपस्थितीत अध्यक्षांची सर्व कामे करणे व इतरवेळी अध्यक्षांना त्यांच्या दैनंदिन कामकाजात मदत करणे.

क. सेक्रेटरी :

संस्थेच्या ध्येय धोरणानुसार व कार्यकारी मंडळाच्या सूचनेनुसार संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, संस्थेचा पत्रव्यवहार व दफतर सांभाळणे, वेळच्या वेळी कार्यकारी मंडळाच्या व संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीने बोलाविणे, कार्यकारी मंडळ व संस्थेचा नोकरवर्ग यांचा दुवा म्हणून संबंध ठेवणे, संस्थेचा कायदेशीर प्रतिनिधी म्हणून काम पहाणे, संस्थेच्या सभांचे इतिवृत्त लिहिणे व कार्यकारी मंडळाच्या सदस्यांना आवश्यक ती माहिती पुरविणे.

ड. खजिनदार :

संस्थेच्या दैनंदिन व वार्षिक जमाखर्चाचे कागदपत्र अद्ययावत ठेवणे, सभासद वर्गणी, देणग्या, अनुदाने, व्याज इ. निधीचे व्यवहार चोख ठेवणे, संस्थेचे बँक खाते चालवणे, संस्थेचा आर्थिक व्यवहार सांभाळणे, मासिक व वार्षिक अंदाजपत्रक तयार करून कार्यकारी मंडळापुढे ठेवणे, संस्थेच्या दैनंदिन खर्चासाठी रूपये 500/- ते 1000/- रोख शिल्लक स्वतःकडे ठेवणे.

ई. सदस्य :

संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सभांना वेळोवेळी हजर रहाणे, संस्थेच्या कामात सूचना, हरकती, मते मांडून चर्चा करणे तसेच इतर पदाधिकाऱ्यांना त्यांच्या कामात मदत करणे व संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी सतत प्रयत्नशील रहाणे.

13) कार्यकारी मंडळाच्या सभा व मागणीच्या सभा :

कार्यकारी मंडळाची सभा ही वर्षातून किमान चार वेळा बोलाविण्यात येईल व आवश्यक वाटल्यास जादा सभा बोलविण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील. अशा सभेची नोटीस सभेपूर्वी किमान सात दिवस आगोदर अध्यक्षांच्या संमतीने संस्थेच्या सेवकामार्फत अगर टपालाने कार्यकारी मंडळाच्या सभासदांना पाठविण्यात येईल. नोटीसीमध्ये सभेची तारीख, वेळ व सभेपुढील कामकाजाचे विषय इ. बाबींचा सामावेश असेल. सभेस किमान 3/5 सभासदांची उपस्थिती आवश्यक राहील. गणसंख्ये अभावी अशी सभा तहकूब करावी लागल्यास त्याच दिवशी, त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल अशा सभेस गणपूर्तीची आवश्यकता भासणार नाही. कार्यकारी मंडळाच्या 2/3 सभासदांनी लेखी अर्ज केल्यास किंवा कार्यकारी मंडळाच्या सर्व सभासदांपुढे एखादी महत्वाची गोष्ट ठेवावयाची असल्यास अगर एखादया विशेष प्रसंगी कार्यकारी मंडळाची एखादी विशेष सभा अध्यक्ष बोलावतील अशा सभेत कार्यकारी मंडळाच्या सभेचे सर्व नियम पाळले जातील.

अध्यक्ष	उपाध्यक्ष	सेक्रेटरी
(श्री. …)	(श्री. स.द.चव्हाण.)	(श्री. का.स.गव्हाणे)

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

14) कार्यकारी मंडळाच्या सभेची सूचना व गणसंख्या :
कार्यकारी मंडळाच्या सभासदांना सभेपूर्वी 7 दिवस आगोदर नोटीस पाठविणे आवश्यक आहे. पण तातडीच प्रसंगी अध्यक्षांस फक्त एका दिवसाची समक्ष सही घेऊन नोटीस तातडीने सभा बोलविण्याचा अधिकार राहील. अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टिंगने पाठविलेली नोटीस एखादया सभासदास वेळेवर मिळाली नाही तर त्यामुळे, बोलावलेली सभा बेकायदेशीर ठरणार नाही. विशेष प्रसंगी वेळेच्या अभावी एखादया तातडीच्या कामासाठी निर्णय घेणे झाल्यास सेक्रेटरी हा अध्यक्षांच्या परवानगीने कार्यकारिणीच्या सभासदांकडे लेखी मत मागवून घेईल व मताधिक्यावरुन तो ठराव अगर निर्णय संमत वा असंमत झाला असे समजण्यात येईल. कार्यकारी मंडळाच्या सभेत 3/5 कोरम असावी पण कोरम अभावी तहकूब झालेली सभा लगेच अर्ध्या तासाने बोलविली जाईल त्यास कोरमची आवश्यकता भासणार नाही.

15) कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियम :
संस्थेच्या कार्यकारी मंडळाची मुदत 5 वर्षे राहील दर पाच वर्षांनी सर्वसाधारण सभेत नविन कार्यकारिणीची निवड केली जाईल. ज्या वर्षी निवडणूक असेल त्या वर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीसीमध्ये तसा स्पष्ट उल्लेख करण्यात येईल. नोटीस एक महिना आगोदर प्रसिध्द केली जांईल. नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्यात उमेदवारी अर्ज मागविणे, त्याची छाननी करणे इ. बाबी पूर्ण केल्या जातील. कार्यकारी मंडळाची निवडणूक वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांमधून गुप्त मतदान पध्दतीने होईल. संस्थेचे विद्यमान अध्यक्ष हेच निवडणूक अधिकारी म्हणून काम पहातील व निवडणूकीचा निकाल जाहीर करतील.

16) कार्यकारी मंडळातील रिक्त पदाबाबत :
मृत्यू, राजीनामा अगर इतर कारणाने कार्यकारी मंडळातील पद रिक्त झाल्यास कार्यकारी मंडळातील राहिलेले अन्य सदस्य बहुमताने भरतील व तसा बदल अर्ज विहित नमुन्यात मे. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सो. पुणे क्षेत्र यांना सादर करतील.

17) सभासदांचे हक्क व कर्तव्ये :

अ. सभासदांचे हक्क :
सर्व सभासदांना संस्थेच्या सर्वसाधारण सभेत उपस्थित राहून चर्चा करण्याचा व मतदानाचा अधिकार राहील व संस्थेच्या वेळोवेळी होणा-या कार्यक्रमांमध्ये सहभागी होता येईल. तसेच लेखी सचूना, तक्रारी व दाद मागण्याचा अधिकार राहील. सभासदांनी आपली वर्गणी एक वर्षाच्या आत पूर्ण भरल्यास त्यांना मतदानाचा हक्क राहील. संस्थेच्या सभासदांना कमीत कमी 1/4 त्यापेक्षा जास्त सभासदांच्या संख्येने तातडीच्या सभा बोलावण्याचा हक्क राहील. संस्थेच्या वेळोवेळी होणा-या सभांच्या सूचना व वार्षिक अहवाल मिळण्याचा अधिकार राहील. संस्थेचा जमाखर्च व इतर आवश्यक माहिती विचारण्याचा हक्क राहील.

ब. सभासदांची कर्तव्ये :
संस्थेच्या प्रत्येक सभेला उपस्थित रहाणे, संस्थेच्या कामकाजावर देखरेख करणे, संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे, पदाधिका-यांना सहकार्य करणे, सर्वसाधारण सभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होते वा नाही ते पहाणे, संस्थेच्या विकासाकरीता निधी उभारण्यास मदत करणे, संस्थेच्या विविध कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहकार्य करणे, संस्थेस स्वतःच्या मालकीची जागा घेण्यास मदत करणे. तसेच देणग्या मिळविण्यासाठी प्रयत्न करणे.

अध्यक्ष	उपाध्यक्ष	सेक्रेटरी
(श्री. रा.ब.सासवडे.)	(श्री. सु.द.चव्हाण.)	(श्री. का.सु.गव्हाणे)

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

18) कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्ये :

संस्थेचे सर्व विद्यमान स्थावर व जंगमं मिळकत व पुढे वेळोवेळी वा अन्य मार्गाने मिळालेली मिळकत संस्थेच्या वतीने कार्यकारी मंडळाच्या ताब्यात राहील. स्थावर मिळकती पासून मिळणारे भाडे वा उत्पन्न वसूल करण्याचा तसेच जंगम मिळकतीचे व्याज वा उत्पन्न वसूल करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे ध्येय व उद्देश साध्य करण्याकरीता वा संस्थेचे कार्य चालविण्याकरीता मंजूर केलेल्या रकमेचा विनीयोग करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील. संस्थेचे कामकाज व्यवस्थित चालावे म्हणून नियम व पोटनियम करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील त्यावर कार्यकारी मंडळाचे नियंत्रण राहील. तसेच संस्थेचे दैनंदिन कामकाज पहाणे, नोकरवर्गाची नेमणूक करणे, त्यांना निवृत्त करणे, संस्थेच्या देण्याघेण्याचे व्यवहार पहाणे, नविन उपसमित्या नेमणे, हिशोब तपासनिसाकडून जमाखर्च व ताळेबंद पत्रक तयार करून अहवाल तयार करणे, वार्षिक सभेत सादर करणे, संस्थेचे हिशेब सन 1860 च्या संस्था नोंदणी अधिनियमातील तरतूदी नुसार ठेवून त्यांची परीक्षण चार्टर्ड अकौंटंट अथवा ॲथॉराईज्ड ऑडिटर कडून करवून घेऊन विहित नमुन्यामध्ये मा. संस्था निबंधक, पुणे यांचे कार्यालयात दरवर्षी आर्थिक वर्ष संपल्यापासून 90 दिवसांचे आत पाठविण्याची तजवीज करणे, पुढील कार्याची रूपरेषा व अंदाजपत्रक तयार करणे व वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे, संस्थेच्या सभासदत्वासाठी आलेल्या अर्जाचा विचार करून त्यावर निर्णय घेणे तसेच संस्थेच्या हिताविरूध्द अगर ध्येय धोरणाविरूध्द कार्य करणा-या सभासदांविरूध्द योग्य ती कारवाई करणे व आवश्यक तर त्याचे सभासदत्व रद्द करणे. वार्षिक सर्वसाधारण सभेने केलेले ठराव, आदेश व धोरण विषयक गोष्टी अंमलात आणणे, संस्थेने नेमलेल्या व्यक्तींची संबंधित माहिती वा विवरणे सन 1860 च्या संस्था नोंदणी नियम क्र. 8 अन्वये अनुसूची 2 च्या नमुन्यात मा. सहाय्यक संस्था निबंधक, पुणे यांचेकडे वेळोवेळी पाठविणे.

19) संस्थेचा निधी, मिळकत व विनीयोग :

संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी सभासद वर्गणी, देणग्या, खाजगी व्यक्तींकडून तसेच शासकीय व निमशासकीय अनुदाने याद्वारे मिळणारे उत्पन्न हया सर्व रकमा हा संस्थेचा निधी समजणेत येईल. तसेच देणगीरूपाने, करार, खरेदी व अन्य मार्गाने मिळणारी स्थावर व जंगम मालमत्ता संस्थेची मिळकत समजण्यात येईल.

वरील मार्गाने मिळणारी रक्कम संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी संस्थेच्या कर्मचा-यांचा पगार व इतर दैनंदिन गरजेसाठी वापरली जाईल. परंतू संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी व्यावसायिक स्वरूपाची मदत केली तर त्याचा मोबदला दिला जाईल. परंतू संस्थेच्या उत्पन्नातील फायदा सभासदांना मिळणार नाही.

20) उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद :

संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी संस्थेच्या एकूण उत्पन्नातून उद्दिष्ट निहाय खर्चाची तरतूद पुढील प्रमाणे राहील.

ज्ञापनातील उद्दिष्टांसाठी	80%
व्यवस्थापकीय उद्दिष्टांसाठी	20%

21) बँक खाते :

संस्थेचा सर्व निधी बँकेत अथवा सहकारी बँकेत संस्थेच्या नांवे खाते उघडून ठेवला जाईल व हे खाते अध्यक्ष, सेक्रेटरी व खजिनदार या तिघांपैकी कोणाही दोघांच्या संयुक्त सहीने चालविले जाईल.

अध्यक्ष (श्री. रा.ब.सासवडे.) उपाध्यक्ष (श्री. सु.द.चव्हाण.) सेक्रेटरी (श्री. का.सु.गव्हाणे)

सचिव
अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण
शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.

कर्ज किंवा ठेवी यासंबंधीची तरतूद :

संस्थेस कायदेशीर मार्गाने कर्ज घेता येईल. त्यापूर्वी मु.सा.वि.व्य. 1950 चे कलम 36 व 35 प्रमाणे मे. [illegible]दाय सह आयुक्त, पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल. तसेच ठेवी स्विकारता येतील.

स्थावर मालमत्ता व विक्री करणे संबंधीची तरतूद :

संस्थेस गरज वाटल्यास अथवा आवश्यक वाटल्यास स्थावर मिळकत खरेदी करता येईल. तसेच आवश्यक तेव्हा संस्थेची मालमत्ता विकता येईल. त्याबाबत संपूर्ण अधिकार कार्यकारी मंडळास राहील. परंतू त्यासाठी संस्थेच्या कार्यकारी मंडळाला मु.सा.वि.व्य. सन 1950 चे कलम 36 अन्वये पूर्तता करून मा. धर्मादाय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांची रितसर परवानगी घेण्यात येईल.

नियम व नियमावलीमध्ये बदल करण्याची तरतूद :

कार्यकारी मंडळाने किंवा बहुसंख्य सभासदाने चालू नियम व नियमावलीमध्ये बदल किंवा दुरुस्ती सुचविली असेल तर वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित सभासदांच्या 3/5 बहुमताने असा ठराव मांडून मंजूर करण्यात येईल. मात्र घटना दुरुस्तीचा मसुदा प्रत्येक सभासदाला नोटीसी बरोबर पाठविला जाईल.

नांव अणि उद्देशांतील बदल :

संस्थेचे नांव अथवा उद्देश यात बदल करावयाचा असेल अथवा दोन संस्थांचे विलिनीकरण करावयाचे असेल तर सन 1860 च्या संस्था कायदयातील कलम 12 किंवा 12 अ यातील असणा-या तरतूदी नुसार कार्यवाही करण्यात येईल.

सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :

1860 चे संस्था नोंदणी अधिनियम कलम 15 अनुसार संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी 1971 च्या संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील नियम 15 प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल.

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम 4 प्रमाणे व 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम 7 प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एकच्या नमून्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावी लागेल.

1860 चे संस्था नोंदणी अधिनियमातील कलम ' अ ' प्रमाणे 1971 चे संस्था नोंदणी महाराष्ट्राचे नियम 1950 प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरी लावलेल्या व्यक्तीस नोकरी संबंधी अटीबाबतचे विवरण अनुसूची दोनच्या नमून्यात आपले विभागाचे सहाय्यक संस्था निबंधकाचे कार्यालयात पाठवावे लागेल.

संस्थेचे विसर्जन :

संस्थेचे विसर्जन करावयाचे झाल्यास 3/5 बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल व संस्था नोंदणी सन 1860 चे अधिनियमातील कलम 13 व 14 प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही करण्यात येईल.

(' दा ख ला ')

असे प्रमाणित करण्यात येते की, ' अजिंक्यतारा क्रिडा व शैक्षणिक प्रतिष्ठान ' या संस्थेच्या नियम व नियमावलीची ही खरी व सत्य प्रत आहे.

सही [illegible] खरी नक्कल

स्थळ : पुणे

दिनांक : 7/5/10/03

11/12/03

(श्री. रा.ब.सासवडे.) अध्यक्ष

(श्री. सु.द.चव्हाण) उपाध्यक्ष

(श्री [illegible] सु. गव्हाणे) सेक्रेटरी

सचिव

अजिंक्यतारा क्रीडा व शैक्षणिक प्रतिष्ठाण

शिक्रापुर, ता.शिरूर, जि.पुणे.